**<u>वाणिज्य शाखेतील अभ्यासमंडळ उद्घाटक सोहळा(२०१७-१८)</u>**

**<u>व्याख्यान</u>**

**<u>विषय:- 'वेळेचे नियोजन'</u>**

**<u>दि. २३/९/२०१७</u>**

**प्रस्तावना :-**

शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये वाणिज्य शाखेतील अभ्यासमंडळाचे उद्घाटन करण्याकरिता मा. प्रा. डॉ. शर्मिष्ठा कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी 'वेळेचे नियोजन' या विषयावर मार्गदर्शन केले.

**अध्यक्ष:** प्रा. डॉ. सुषमा देशमुख

**उद्घाटक:** प्रा. डॉ. शर्मिष्ठा कुलकर्णी

**आयोजक -** वाणिज्य शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम)

**सहभाग-** बी कॉम (मराठी व इंग्रजी माध्यम) १, २, ३ च्या विद्यार्थीनी

**उद्देश :-**

१. अभ्यासमंडळाच्या माध्यमातून विविध अभ्यास पूरक कार्यक्रमाचे आयोजन करणे.
२. विविध विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करून विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास करणे.
३. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्वाचा विकास करणे.

**अहवाल**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळव्दारा संचालित महिला महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विविध अभ्यासमंडळाचे उद्घाटन मा.प्रा.डॉ.शामिष्ठा कुळकर्णी यांच्या हस्ते संपन्न झाले.उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.सुषमा देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.शालिनी पांडे यांनी केले.या प्रसंगी त्यांनी अभ्यासमंडळ गठण करण्याचा

उददेश स्पष्ट करून वर्षभरात राबविल्या जाणाऱ्या विविध  कार्यक्रमाची माहिती दिली.

**उद्घाटनवर भाषणामध्ये प्रा.डॉ.एस.एस.कुळकर्णी यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीना टाईम** मॅनेजमेंट या विषयावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थीनिनी केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित न  करता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यामध्ये संदेशवहन ,नेतृत्व या गुणांचा विकास होणे आवश्यक आहे. त्याकरिता अभ्यासमंडळ गठीत करून त्यामाध्यमाने त्यांचा विकास साधता येतो असे मत त्यांनी व्यक्त केले .अभ्यासमंडळाच्या माध्यमातून चांगल्या विचारांची देवाण घेवाण होते.त्याचप्रमाणे माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून सुद्धा आपण विविध विषयांचे ज्ञान अवगत करू शकतो .पण ह्याकरिता वेळेचे नियोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले . वेळेचे योग्य नियोजन केल्यास स्पर्धा परिक्षेची उत्तम तयारी देखील करता येईल असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले आहे

अभ्यासमंडळ कार्यकारिणी अध्यक्ष कु. भाग्यश्री नेहर हेने अभ्यासमंडळाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेत अभ्यासमंडळाचे गठन  हे विद्यार्थिनीच्या विकासासाठी किती आवश्यक आहे त्याचे  महत्व पटवून दिले.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. एस. एस. देशमुख यांनी विद्यार्थीनिनी आपले सर्वप्रथम उद्दिष्ट निश्चित करून वेळेचे नियोजन केल्यास यश प्राप्त करता येते . त्याचप्रमाणे विद्यार्थीनीच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता अभ्यास मंडळाची भूमिका ही फार महत्वपुर्ण ठरत असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे संचालन कु. राजश्री नेहर तर आभार प्रदर्शन कु. निकिता गायकवाड हिने केले.कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.शालिनी पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.नयन मासोदकर,प्रा.मोनिका देशमुख ,प्रा.बजाज यांनी केले कार्यक्रमास वाणिज्य शाखेतील नियमित तसेच तासिकाभार तत्वावरील सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या .

**फलनिष्पत्ती :-**

१) कार्यक्रमाचे आयोजन,संचालन व आभारप्रदर्शन विद्यार्थीनिनी केले.

२) विद्यार्थीनिनी वेळेचे नियोजन कसे करावे या संदर्भात मार्गदर्शन लाभले.

## वाणिज्य शाखेतील अभ्यासमंडळ उद्घाटक सोहळा(२०१७-१८)




***वाणिज्य शाखेतील अभ्यास मंडळाचे उद्घाटनपर भाषण करतांना मा.प्रा.डॉ.शर्मिष्ठा कुळकर्णी***

***अभ्यास मंडळ गठीत करण्याची भूमिका मांडताना कु.राजश्री नेहर***







***अध्यक्षिय भाषण करतांना प्रा.डॉ.सुषमा देशमुख***